क्र.सांख्यिकी / MIS / १२२ /346/ २०१५

परिपत्रक :-

विषय : व्यवस्थापकीय माहिती पध्दत (एम.आय.एस.) सन २०१५—१६ वेबपोर्टलवर माहिती भरणेबाबत.

संदर्भ : १.कंमाक अशिसं/सांख्यिकी/एम.आय.एस / २०१५—१६ / ९४८३, दिनांक २८ सप्टेंबर, २०१५.

२. UDSTAT/ICD/2015-16/273 Dt.19/1/2016.

महोदय,

मुंबई विद्यापीठातील संलग्नित महाविद्यालयामधील प्राचार्य , संचालक व संस्था यांचे मा. शिक्षण संचालक उच्च शिक्षण, पुणे, यांच्या पत्राकडे लक्ष वेधु इच्छितो की -

राज्यातील उच्च शिक्षणबाबचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षांची सांख्यिकी माहितीची मॅनेजमेंट इंफॉरमेशन सिस्टिम ( MIS) अत्यंत आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या सर्व अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र [इतर नॉन एआयसीटीई (अभियांत्रिकी(Engginearing), वास्तुशास्त्र(Architecture), व्यवस्थापन(Management),औषधनिर्माण शास्त्र(Pharmacy)अभ्यासकम वगळता] अभ्यासकम शिकविणा-या महाविद्यालयांकडून ऑनलाईन पध्दतीने विवरणपत्रांमध्ये माहिती मागविण्यात येत आहे.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत सहसंचालक कार्यालय, विद्यापीठे आणि महाविद्यालये यांचेकरिता प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेत्तर बाबींच्या ऑनलाईन माहिती नोंदणीकरिता www.dhemis.maharashtra.gov.in या वेबपोर्टलवर माहिती नोंदणीची लिंक विकसित केलेली आहे. तरी शैक्षणिक वर्ष २०१५-१६ या वर्षाकरिता संबंधित आवश्यक असलेली माहिती संचालनालयास देणे अत्यावश्यक आहे.

त्याकरिता संलग्नित महाविद्यालये, संस्था यांनी उच्च शिक्षण संचालनालय यांना संबंधित माहिती सादर करण्यासाठी www.dhemis.maharashtra.gov.in या वेबसाइटवर जाऊन व तेथे उपलब्ध असलेल्या विविरण पत्रामध्ये संकलित करणे आवश्यक आहे. तसेच ती माहिती वेबपोर्टलवर संकलित करीत असताना काही अडचणी किंवा त्रुटी आढळल्यास दुरध्वनी— 022-22618987 / 022-22708738 या दूरध्वनी कमांकावर त्वरीत संर्पक साधणे.

उपरोक्त सर्व बाबी लक्षात घेता आपणास असे सुचित करण्यात येते की, संचालनालयास अपेक्षित असलेली संबंधित माहिती नोंदणीचा कार्यक्रम **दिनांक १/१०/२०१५** पासुन चालू झाला असुन ती माहिती शासन आदेशानुसार पुर्ण करावयाची असल्या-कारणाने त्या सदरील माहितीचा संपुर्ण एकत्रित अहवाल शासनास **दिनांक ५/४/२०१६** पर्यत सादर करण्यात येणार आहे. आणि म्हणून संचालनालयाकडुन विचारण्यात आलेली संबंधित माहिती त्वरीत वेबपोर्टवलवर संकलित करण्यात यावी जेणेकरून शासनास त्याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करणे सोयीचे होईल.

**तरी संचालनालयास संबंधित आवश्यक असलेली माहिती दिनांक ५/४/२०१६ पर्यंत आपणाकडुन ऑनलाईन पध्दतीने विहित विवरणपत्रांमध्ये तात्काळ भरून पाठवावी. सदर माहिती पाठविण्यास आपल्याकडुन विलंब झाल्यास होणा-या शासन कारवाईस संस्थेचे जबाबदार या नात्याने आपणास सामोरे जावे लागेल, याची कृपया नोंद घ्यावी.** [सोबत सांख्यिकी कक्षाकडून संबंधित विषयाबाबत प्रमाणपत्र घेऊन जावे.]

उपकुलसचिव

(जनसंपर्क विभाग/सांख्यिकी कक्ष/प्रकाशन विभाग)

मुंबई - ४०० ०३२

दिनांक : ३१ मार्च, २०१६

**ज्या महाविद्यालय/संस्था यांनी उपरोक्त परिपत्रकानुसार संबंधित माहिती संकलित केली असल्यास सदरचे परिपत्रक दुर्लक्षित करावे.**